महाराष्ट्रराज्यमाध्यमिकवउच्चमाध्यमिकशिक्षणमंडळ,
नागपूरविभागीयमंडळ, सिव्हिललाईन्स, नागपूर-४४०००१

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं/पमा/2784
नागपूर, दिनांक :– 09/08/2023

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शळा
नागपूर विभाग

विषयः– इ. 10 वी फेब्रुवारी/मार्च 2024 करीता खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी बाबत...

संदर्भः– जा. क. रा.मं./परीक्षा – 3/3466 दि.– 08/08/2023.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इ. 10 वी खाजगीरित्या प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यासाठी प्रचलीत पध्दतीनुसार संपर्क केंद्रामार्फत नावनोंदणी प्रकिया राबविण्यात येत होती सदर पध्दत बंद झाली असून इ. 12 वी च्या विद्यार्थ्यांचे ज्या पध्दतीने सर्व कनिष्ठ महाविद्यालयाकडुन नाव नोंदणी अर्ज ऑनलाईन प्रकियेव्दारे भरून घेण्यात येतात त्या प्रमाणेच माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इ. 10 वी च्या खाजगी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळांकडुन ऑनलाईन प्रकियेव्दारे भरून घेण्यात येणार आहे.

सदर बाबतचे प्रकटन मंडळाचे या (**www.nagpureduboard.in**) संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उपरोक्त बदलाबाबत नोंद घेवून पुढील कार्यवाही करावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर